पान १ वरून

## खासदारांचा जनता दरबारात इच्छुकांच्या फ्लेक्सची मांदियाळी

स्वतंत्र बैठक आयोजित केली जाणार आहे. तर लोहगाव विमानतळाला जगद्गुरु संत तुकाराम महाराज विमानतळ असे नामकरण करण्यासाठी केंद्र सरकारच्या कॅबिनेटमध्ये प्रस्ताव दाखल केला आहे. लवकरच त्याचा निर्णय लागेल. आळंदीपर्यंत मेट्रो जाणार आहे यासाठी महा मेट्रो संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासोबत बैठक झाली आहे . आळंदी मेट्रोसाठी स्वतंत्र डीपीआर करण्याच्या सूचना दिल्या आहेत , असे मोहोळ यांनी सांगितले.

**जनता दरबारात अनेक टेबल रिकामे !**

केंद्रीय सहकार व विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे सेवा संपर्क अभियान अर्थात जनता दरबारात अनेक टेबल रिकामे होते. यामध्ये म्हाडा , राष्ट्रीयकृत बँकेचे मुद्रा लोन, रोजगाराच्या विविध योजना माहिती यासह टेबल रिकामे होते. जनता दरबारात चारशेच्यावर नागरिकांचे प्रश्न मोहोळ यांनी ऐकले.

## नागरी संरक्षण दलाचा तीन हजार चौ. मी. भूखंड वाचला

परिस्थितीत, नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती दरम्यान नागरीकांना बचाव करण्यासाठी पर्वती येथील मध्यवर्ती जागेचा वापर होऊ शकतो. या ठिकाणी पाण्याची भूमिगत टाकी असून युद्ध काळात या पाण्याचा वापर केला जातो. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीकोनातून भारतीय संरक्षण प्रबोधिनी, दक्षिण कमांड, हवाई दलाचे तांत्रिक बेस स्टेशन, खडकी येथील दारुगोळा कारखाना, पुणे शहराला पाणीपुरवठा करणारी पानशेत, वरसगाव, खडकवासला, मुळशी ही धरणे आहेत. पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातून मुळा व मुठा या महत्त्वाच्या नद्या वाहतात. दरवर्षी या नद्यांना पूर आल्यावर नागरिकांना स्थलांतर करण्यासाठी पर्वती व येरवडा उपनियंत्रण येथे पावसाळी पूरजन्य परीस्थितीमध्ये बाधित नागरीकांसाठी निवारा केंद्रासाठी जागेचा वापर केला जातो. पर्वती येथील नागरी संरक्षण दलाच्या जागेवर हजारो स्वयंसेवक प्रशिक्षित करण्यात आले आहे. गेली अनेक वर्षे या ठिकाणी नागरी संरक्षण दलाचे प्रशिक्षण सुरू आहेत. मात्र, पुणे शहर तहसिलदारांनी या जागेचा वापर गेली दहा वर्षांपासून होत नसल्याच खोटा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला दिला होता. त्यामुळे येथील जागा ताब्यात घेण्याच्या हालचाली वेगाने सुरू होत्या. कोणाच्या मर्जीने, कोणाच्या घशात हा भूखंड टाकण्यात येत असल्याची जोरदार चर्चा होती. मात्र, त्यानंतर राज्याच्या महसूल विभागाने ही जागा नागरी संरक्षण दलाच्या ताब्यात ठेवण्याचे जैसे थे आदेश दिले.

## महिलेचे गळयातील मंगळसुत्र हिसकाऊन घेवुन चोरी करणारे आरोपी जेरबंद

हिवरकर यांचे मार्गदर्शनाखाली पर्वती पोलीस स्टेशन चे तपास पथक प्रभारी पोलीस उप-निरीक्षक किरण पवार हे करत होते. पोलीस अंमलदार प्रकाश मरगजे, राकेश सुर्वे, अमित चिव्हे, यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती वरून सदरचा गुन्हा हा रोहन प्रभू तुपारे ( वय २० वर्षे, रा. सर्व्हे ६४८/७ त्रिमुर्ती नगर, अप्पर बिबवेवाडी) व केशव ईश्वर कुंभार ( वय १८ वर्षे रा. खोपडेनगर चक्की कारखाना, महांगडेवाडी) यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यांना शिताफिने पकडुन त्याचे ताब्यातुन ५ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड व एक मोटार सायकल असा एक लाख ११ हजार रुपये . चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

## महिलेचा वेष व मास्क धारण करून कंपनीत केली चोरी

सीसीटीव्ही फुटेजमधील महिला आहेत अगर पुरूष याचा तपास करणे गुंतागुंतीचे झाले होते. त्यामूळे विविध ठिकाणची सीसीटीव्ही पाहून व आरोपींनी घातलेली चप्पल तसेच बातमीदारकाडून मिळालेली बातमी जुळती मिळती असल्याने पोलीस अंमलदार गोपाळ मदने, अमोल गायकवाड व अर्शद सय्यद यांनी सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी नामे अमन अजिम शेख (वय. २४ वर्षे, रा. सर्वे नं.१०८/१०९, आनंदनगर, रामटेकडी, हडपसर) व मुसा अबु शेख (वय.२४ वर्षे, रा. हडपसर) यांनी केल्याचे निष्पन्न केल्याने त्यांना अटक करून विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा कबूल केला. पोलीसांची दिशाभूल व्हावी व आम्हाला पकडू नये म्हणून महिलांचे वेश परिधान केल्याचे आरोपींची सांगितले. त्यांचेकडून चोरीस गेलेला एकुण २,१९,०००/-किं. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

## गोळीबार करुन पळुन जाणाऱ्या आरोपीस केले २४ तासांत जेरबंद

यांनी एक पथक तयार केले. आरोपीचा शोध घेत असताना पथकास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की शुक्रवारी विरभद्रनगर बाणेर पुणे येथे मुलीवर फायरींग करणारा गौरव नायडु हा रेल्वेने जाण्यासाठी खडकी रेल्वे स्टेशन येथे येणार आहे. त्याचेकडे पांढऱ्या रंगाची व्हेस्पा गाडी आहे. त्याने अंगात फिकट चॉकलेटी रंगाचा टि शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने पथक खडकी रेल्वे स्टेशन येथे सापळा लावुन थांबले. थोड्याच वेळात आरोपी खडकी रेल्वे स्टेशनकडुन खडकी बाजारकडे जाणा-या रस्त्याला गाडी लपवणेसाठी जात होता. पोलीसानी त्यास घेराव घालुन पकडले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव गौरव महेश नायडु (वय २५ वर्षे, रा. श्रीरंग रेसिडेन्सी, गायकवाडनगर पुनावळे) असे असल्याचे सांगितले. असा एकुण १,३३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपीचे ताब्यातुन जप्त करणेत आला आहे.

## बारामतीत स्पीड ब्रेकरमुळे मेडिकलच्या विद्यार्थिनीचा मृत्यू

शरयू ही वैद्यकीय पदवीच्या तिसऱ्या वर्षांमध्ये शिकत होती. तिचे वडील सांगली जिल्ह्यात उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम करतात. पुढील एका वर्षात ती डॉक्टर म्हणून बाहेर पडणार होती. मात्र तोपर्यंत तिच्यावर काळाने घाला घातला.

## गुन्हेगार लखन भोसले पुण्यात पोलिस एन्काऊंटरमध्ये ठार

दागिने चोरी केले होते. या घटनेचा व्हिडिओ सीसीटीव्ही कॅमेऱ्यातही कैद झाला होता. या प्रकरणानंतर तो फरार झाला होता. त्याला अटक करण्यासाठी सातारा पोलिसांचे चार सदस्यीय पथक शिक्रापूर येथे रवाना झाले होते. मात्र अटक करण्याच्या प्रयत्नात आरोपी लखन भोसलेने पोलिसांवर हल्ला केला. या हल्ल्यात चार पोलीस गंभीर जखमी झाले. लिखन भोसले हा खटाव तालुक्यातील जयराम स्वामी वडगाव येथील रहिवासी असून त्याच्यावर सातारा, सांगली, पुणे आणि इतर काही जिल्ह्यांत घरफोडी, दरोडे, चोरी, मारहाण अशा अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. पोलिसांनी खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनंतर शिक्रापूर परिसरात सापळा रचला होता. दरम्यान, पोलिसांनी आरोपींना अडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी शस्त्रासह पोलिसांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. आत्मसंरक्षणासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात लखन भोसले जागीच ठार झाला.

# महावितरणला पिंपरी चिंचवड प्रमाणे रस्ते खुदाई शुल्क आकारावे

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे निर्देश; पुणे जिल्हा विद्युत सनियंत्रण समिती बैठक

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर व जिल्ह्यात महावितरणमार्फत विविध योजनेतून विजेची पायाभूत कामे सुरु आहेत. मात्र भूमिगत वाहिन्या टाकण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून महावितरणला जादा खुदाई शुल्क आकारले जात असल्याने अनुमानित रकमेत प्रकल्पाची कामे होत नाहीत. त्यामुळे पुणे महापालिकेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका ज्याप्रमाणे शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार रस्ते खुदाई घेते त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिकेनेही रस्ते खुदाई शुल्काची आकारणी करावी असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी जिल्हा विद्युत सनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले.



शनिवारी (दि. ३०) दुपारी सर्किट हाऊस सभागृहात जिल्हा विद्युत संनियंत्रण समितीची बैठक उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला आ. योगेश टिळेकर, आ. शरद सोनावणे, आ. बाबाजी काळे, आ. शंकर मांडेकर, आ. शंकर जगताप, आ. सिद्धार्थ शिरोळे, आ. चेतन तुपे, आ. बापुसाहेब पठारे यांचेसह जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकारी अर्चना पठारे, पिंपरी चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल काकडे व धर्मराज पेठकर, महापारेषणचे अधीक्षक अभियंता विठ्ठल भुजबळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत महावितरणतर्फे जिल्ह्यात सुरु असलेल्या आरडीएसएस, पीएम सूर्यघर, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आदींसह जिल्हा विकास निधीतून मिळणाऱ्या योजनेतील कामाचे सादरीकरण करण्यात आले. आरडीएसएस योजनेतून विद्युत वाहिन्यांचे बळकटीकरण करण्यासाठी १७८ कोटींचा निधी मिळाला आहे. यामध्ये जिल्ह्यात ११ नविन उपकेंद्रे व १७ उपकेंद्राची क्षमतावाढीसह इतर कामे होणार आहेत. वितरण हानी कमी करण्यासाठी पुणे शहरात १३२० किमी उच्चदाब वाहिन्या भूमिगत केल्या जाणार आहेत. तर १४६ ठिकाणी नविन रोहित्रे उभारली जाणारआहेत. तसेच ग्रामीण भागासाठी ५०५ कोटी निधी मिळाला असून यानिधीतून २४०८ किमी उच्चदाब व २०६४ किमी लघुदाब वाहिन्यांची कामे होणार आहेत. याशिवाय २९८४ वितरण रोहित्रेही उभारली जाणार आहेत.

आरडीएसएस योजनेतील कामांची व्याप्ती पाहता यामध्ये भूमिगत वाहिन्यांचा मोठ्या प्रमाणात समावेश असल्याने व जादा खुदाई शुल्कामुळे या कामांच्या पूर्णत्वास विलंब होत असल्याचे पालकमंत्री महोदयांच्या निदर्शनास आले. त्यावेळी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी महापालिका आयुक्तांना खुदाई शुल्क आकारणी करताना पिंपरी चिंचवड मनपाची कार्यपद्धती अवलंबावी. पिंपरी मनपा १०० रुपये प्रतिमिटर इतके पर्यवेक्षण शुल्क घेते. यामध्ये खोदलेला रस्ता दुरुस्त करण्याची जबाबदारी महावितरणची असते. तर पुणे महानगरपालिका प्रतिमिटर ६६०० रुपये इतकी आकारणी करते. ज्यामध्ये रस्ते दुरुस्तीचा अंतर्भाव आहे.

जिल्हा विकास निधीतूनही महावितरणला गतवर्षी ४० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित होता. त्यापैकी २१ कोटी निधी महावितरणला प्राप्त आहे. तर चालू २०२५-२६ वर्षासाठी महावितरणने जिल्हा विकास निधीतून ९४ कोटी रुपयांचा प्रस्ताव दिलेला आहे.

**पीएम-सूर्यघर योजनेला गती द्या**

पुणे जिल्ह्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा आतापर्यत २० हजार ७६ ग्राहकांनी लाभ घेतला आहे. त्याची स्थापित क्षमता जवळपास ९४ मेगावॅट इतकी आहे. या योजनेला महावितरणने अधिक गती द्यावी. त्याचा प्रचार प्रसार करुन वीज ग्राहकांना या योजनेसाठी प्रोत्साहित करावे असेही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी सांगितले.

**महापारेषणला उपकेंद्राची कामे तातडीने सुरु करण्याचे निर्देश**

पुणे जिल्ह्यात महापारेषण कंपनीची ११ अतिउच्चदाब उपकेंद्रे मंजूर आहेत. तर ११ अतिउच्चदाब केंद्रे प्रस्तावित आहेत. त्यापैकी ज्या उपकेंद्रांना मंजुरी मिळालेली आहे. त्यांची कामे तातडीने हाती घ्यावीत व ती वेळेत पूर्ण करावीत असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महापारेषणचे अधीक्षक अभियंता विठ्ठल भुजबळ यांना दिले.



## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून ३२ जण सेवानिवृत्त

**पिंपरी । प्रतिनिधी**

महानगरपालिका सेवेत वर्षानुवर्षे कामकाज करून सेवानिवृत्त होणारे अधिकारी, कर्मचारी यांनी सातत्य,सचोटी व जबाबदारीने केलेल्या सेवेमुळे महानगरपालिका वेगाने मार्गक्रमण करीत असल्याचे प्रतिपादन उप आयुक्त संदीप खोत यांनी केले आणि सेवानिवृत्तांना आरोग्य व आनंदी जीवनासाठी शुभेच्छाही दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे माहे ऑगस्ट २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या २३ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या ९ अशा एकूण ३२ कर्मचाऱ्यांचा उप आयुक्त संदीप खोत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, संगणक अधिकारी वैभवी गोडसे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महापालिका महासंघाचे नंदकुमार इंदलकर, माया वाकडे तसेच विविध विभागातील कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे जुलै २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, कार्यकारी अभियंता विजय वाईकर, उप अभियंता मोहन खोंद्रे कार्यालय अधीक्षक साधना ढमाले, पांडुरंग मोरे , गट निर्देशक मनोज ढेरंगे, सिस्टर इनचार्ज शारदा भोर, संगीता कदम, लघुलेखक प्रशांत काळेगोरे, भांडारपाल अनय म्हसे, क्रीडा शिक्षक विजय लोंढे, ए. एन.एम. वंदना गोपकर, सुरक्षा सुपरवायझर शंकर आरोळकर, लिपिक शंकर कानडी, वायरमन संजय पांढरकर, रखवालदार मधुकर भारती, शिपाई सुनिता फाले, मुकुंद गुरव, मजूर गणपती नाईक, आया रोहिणी सोन्नयल्लू, विशाखा जाधव, गटर कुली चंद्रकांत जगताप, सफाई कामगार आशा जगताप यांचा समावेश होता.

तर स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्य निरीक्षक संजय गेंगजे, सफाई कामगार गेनबहादूर खत्री, मैनाबाई सोनवणे, सोजर शिंदे, सफाई सेवक शेषराव वाकोडे, अन्वर गागडे, कचरा कुली संजू घोलप, मुकादम अनिल तापकीर, सफाई कामगार पोपट चव्हाण यांचा समावेश आहे.

# शहरामध्ये विक्रीसाठी आलेला २८ किलो गांजा जप्त; आरोपी जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. अमितेश कुमार यांनी पुणे शहरामध्ये अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणेकरीता अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटण करणेबाबत आदेशीत केले असल्याने दि.२८/०८/२०२५ रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे गणेशोत्सव व गुन्हे प्रतिबंध, अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असताना टिटॉज हॉटेल जवळ, वाघोली, पुणे येथे पोलीस अंमलदार प्रदिप मोटे यांना संशयित कार दिसल्याने त्यांना हटकले असता वाहन चालकाचे शेजारी बसेलला इसम हा घाईगडबडीने उतरुन पळुन गेला. त्यावेळी त्यांचेवर अधिक संशय आल्याने वाहन चालकास ताब्यात घेवून त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव विलेश धारासिंग पावरा वय २२ वर्षे रा.महादेव दोंदवाडा ता. शिरपुर जि. धुळे असे असल्याचे सांगितले. त्यावेळी विलेश धारासिंग पावरा याचे ताब्यातील चारचाकी गाडीची झडती घेतली असता त्यामध्ये ५,७६,०४०/- रू. किं.चा २८.८०२ किलोग्रॅम गांजा, १०,०००/-रू.किं.चा मोबाईल, ५,००,०००/-रू. किं. ची चारचाकी गाडी असा एकूण १०,८६,०४०/- रू. किं. चा मुद्देमाल मिळून आला. सदरचा मुद्देमाल जप्त करून वाघोली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४५८/२०२५, एन.डी. पी.एस. अ‍ॅक्ट क. ८ (क), २० (ब) (ळळ) (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीस नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.




# गणेशोत्सव पर्यावरण पूरक साजरा करण्याचा निर्धार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिका अंतर्गत पर्यावरण पूरक गणेशोत्सव २०२५ दरम्यान भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पर्यावरण पूरक गणेशोत्सवात गणेशमूर्ती विसर्जन व संकलन करिता स्वारगेट पोलिस लाईन, महाराणा प्रताप विद्यालय, आनंदीबाई कर्वे शाळा, महर्षी आण्णासाहेब शिंदे शाळा व सावित्रीबाई फुले प्रशाळा, के. सी. ठाकरे विद्यालय असे एकूण ०६ ठिकाणी गणेश मूर्ती विसर्जन व संकलन केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे.




गणेशमूर्ती विसर्जन करिता एकूण ०८ लोखंडी टाकी उपलब्ध करून नियोजन केले आहे यामध्ये शाडू मातीचे गणेशमूर्ती संकलन करणेकामी स्वारगेट पोलिस लाईन, आनंदीबाई कर्वे शाळा, सावित्रीबाई फुले प्रशाळा येथे स्वतंत्र लोखंडी टाकीची व्यवस्था करणेत आली आहे. तसेच गणेश मूर्ती विसर्जित करण्याकरिता ०३ हौदांची व ०४ ठिकाणी संकलन केंद्राची व्यवस्था करणेत आली आहे.

याचबरोबर सार्वजनिक गणेशोत्सवात भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय मार्फत गणेश मूर्ती विसर्जित ठिकाणी स्वतंत्र एकूण १० निर्माल्य कंटेनर ठेवण्यात आले आहेत. ५५६

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गणेशमूर्ती विसर्जना करिता भाविकांनी जास्तीत जास्त कृत्रिम हौदामध्ये गणेशमूर्तीचे विसर्जन करणे तसेच शाडू मातीचे गणेश मूर्ती स्वतंत्र उपलब्ध लोखंडी टाकी मध्ये विसर्जन करून गणपती बाप्पांना निरोप द्यावे असे प्रबोधन व जनजागृती करण्यात येत आहे तसेच संपूर्ण गणेशविसर्जन मिरवणूक मार्गावर १७ फिरते शौचालयांची व्यवस्था करणेत आली आहे.


# झाडांची लायब्ररी; ११९ प्रजातींची ५१५ रोपटी

**पुणे । प्रतिनिधी**

वनस्पती लागवडीसाठी एक आराखडा तयार केला असून एक एकर जागेत (२०० फूट लांबी व २०० फूट रुंदी)१० बाय १० अंतरावर ग्रीड (चौरस आकाराचा खण) घेणे असे साधारणत: ४०० ग्रीडस होतात. मध्यभागी २० बाय बाय२० फुटांचे बांबूचे झोपडे बांधले.

शेजारी २० बाय २० फुटाची पाण्याचा तलाव करणे, प्रत्येक ग्रीडमध्ये एक रोपटे लावणे. साधारणत: एकमेका शेजारील चार ग्रीडमध्ये ४ सारख्या प्रकारची रोपे लावणे. म्हणजे भविष्यात ही चार रोपे एकमेकांच्या सहवासात चांगली वाढतात. अशी ११९ प्रजातीची स्थानिक, देशी लहान मोठी झाडे, वेली, झुडूप सुमारे ५१५ रोपटी लावल्याने त्यांची वाढ योग्य होईल. अशी रोपांची निवड करून लागवड केली जाते. त्यासाठी ड्रीप आठवड्या तीन वेळा सुरुवातीस अर्धा तास पाणी देणे, संरक्षणासाठी कुंपण करणे, अथवा चर घेणे. अशा मानव निर्मित देवराईचे अनेक फायदे आहेत.त्यातील महत्वाचे काही खालील प्रमाणे

१)झाडाची लायब्ररी (ग्रंथालय) तयार होते. जशी पुस्तके वेगवेगळया खणात ठेवली जातात. त्याचा एक नकाशा असतो. त्या ठिकाणा प्रमाणे प्रत्येक जण त्या खणात जाऊन वाचू शकतो तसेच झाडांचे सुद्धा प्रत्येक ग्रीडला क्रमांका नुसार रोपांची रचना व लागवड केल्यामुळे झाड वाचू शकते.त्याचे खोड, पान, फुल,



फळ ते पाहून वाचू शकतो. आता झाडे कागदावर न वाचता प्रत्यक्षात वाचली गेली तर त्या झाडाविषयी आत्मीयता निर्माण होईल वृक्ष लागवडीच्या संवर्धनाला चालना मिळेल

२) Seed Bank या देवराईत आपल्याला लाखो बिया मिळतील त्यापासून कायम स्वरुपाची दरवर्षी बिया मिळून संपूर्ण जिल्ह्यातील वृक्ष लागवडीसाठी रोपे तयार डोऊ शकतील. ३) Seeddisposalhdoमार्फ त पक्षामार्फत, मधमाशा, फुलपाखरांमार्फत लाखो बियांचे प्रसरण होऊ अनेक बिया रूजून पूर्वी सारखी जंगल निर्माण होण्यास मदत होईल.

४) सदर देवराईत पॉझिटीव्ह (+) एनर्जी ७५० असल्यामुळे(इतरत ठिकाणी साधाणत: ३५० असते.) त्या देवराईत ध्यान करू शकतो. वाढदिवस साजरे करणे, बारसे करणे, गाव बैठक घेणे इत्यादी प्रकारे उपयोग होऊ शकतो. कृषी प्रर्यटन केंद्रासाठी हा एक अभिनव प्रकल्प आहे. तसेच देवराई एक प्रकारची oxygen Bank होऊ शकते. अनेक सजीवांना आश्रय स्थान मिळेल, कायमस्वरूपी अन्न-पाण्याची सोय होऊ शकते. मातीची धूप थांबते. हवेतील प्रदूषीत धुलीकण रोखण्यास मदत होते. अशी ही मानव निर्मित देवराई ही काळाची गरज असून वृक्ष लागवडीस एक प्रकारची दिशा देणारी दिशादर्शक देवराई आहे. ज्यांना कोणाला वैयक्तिक अथवा गावपातळीवर देवराई उभारायची असेल त्यांना रोप लागवडी आराखडा व रोपे विनामूल्य दिली जातील. तसेच संपूर्ण मार्गदशन केले जाते.

आता पर्यंत महाराष्ट्रात व महाराष्ट्रा बाहेर ३६ देवराया उभ्या राहिल्या आहेत. त्यात रोपांचे जगण्याचे प्रमाण ९९ टक्के पर्यंत आहे. देवराया करण्याचा मानस असल्याचे देवराई फाऊंडेशनचे रघुनाथ ढोल यांनी सांगितले.